## प्रथम श्रेणी बाष्पक परीचर क्षमता प्रमाणपत्र परीक्षा, नागपूर, डिसेंबर-२०२५ करीता आवश्यक अर्हता व अनुभव.

१. प्रथम श्रेणी बाष्पक परिचर अर्जदाराचे वय २० वर्षापेक्षा कमी नसावे.

२. उमेदवार हा व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर क्षमता प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. ज्या बाष्पकाची तपनक्षमता ५० मी$^{२}$ पेक्षा कमी नाही, अशा बाष्पकावर व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर म्हणून स्वंतत्रपणे दोन वर्ष कामाचा अनुभव असावा.

**किंवा**

मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( तांत्रिक संस्था ) यांचे प्रमाणपत्र धारण करणारा, ज्यांनी तीन वर्षाचे औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण केलेले असून, त्यापैकी एक वर्षाचा कालावधी हा त्यांनी बाष्पके असणा-या कारखान्यामध्ये अथवा इंजिनिअरींग कार्यशाळेमध्ये जिथे इंजिन आणि बाष्पके दुरुस्तीची किंवा तयार करण्याचे कामे केली जातात अश्या ठिकाणी शिकाऊ उमेदवार (An Apprentice) म्हणून प्रत्यक्ष काम केलेले असावे. या कामाबरोबर त्याने किमान एक वर्ष स्वतंत्ररित्या ५० मी$^{२}$ तपनक्षमतेपेक्षा कमी नाही, अशा बाष्पकावर व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर म्हणून काम केलेले असावे.

**किंवा**

प्रथम श्रेणी बाष्पक परिचराच्या अधिपत्याखाली काम करणा-या व व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवारास ज्या बाष्पकाची तपनक्षमता ही ५० मी$^{२}$ पेक्षा जास्त आहे, अशा बाष्पकावर आगवाला किंवा सहायक आगवाला या पदावर किमान दोन वर्ष सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे.

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना.

(अत्यंत महत्वाच्या)

१. उमेदवाराने प्रपत्र-अ या नमुन्यामध्ये ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता https://exam.mahaboiler.in OR https://mahaboiler.in या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाचा वापर करुन केवळ ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज सादर करणे अनिवार्य आहे, विहित पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीने सादर केलेले/पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरले जाणार नाहीत. तसेच ऑफलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरलेले चलन इत्यादीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे उमेदवारांनी खालिल सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच आपला अर्ज सादर करावा.

२. ऑनलाईन अर्ज प्रणालीव्दारे अर्ज सादर करताना सर्वप्रथम उमेदवाराने अर्जासोबत अपलोड करणेकरीता (१) रंगीत पासपोर्ट फोटो (२) सही (३) व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर प्रमाणपत्र (४) जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा दहावी बोर्ड प्रमाणपत्र किंवा ज्या प्रमाणपत्रावर जन्मतारीख नमूद असेल असे प्रमाणपत्र (५) राष्ट्रीयत्वाचा दाखला/पारपत्र (Passport) /डोमिसाईल प्रमाणपत्र **(याबाबत इतर राज्याच्या उमेदवारांनी अनुक्रमांक-सात वाचावा )** (६) शासकीय अथवा खाजगी वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या नोंदणी क्रमांकासहीत दिलेले मेडीकल सर्टिफिकेट (७) निरीक्षण अधिकारी यांनी पडताळणी करुन प्रतिस्वाक्षरीत केलेले व त्यावर त्यांची सही व शिक्का असलेले सेवाप्रमाणपत्र. (८) रुपये ५००/- परीक्षा शूल्क भरल्याचे चलन, इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन प्रणालीमध्ये नमूद केलेल्या विहीत फॉरमॅट व साईजमध्ये स्कॅन करुन तयार ठेवावी.

कृ.मा.प......:२

३. सदर परीक्षेकरीता अर्ज सादर करण्यासाठी प्रथम उक्त संकेतस्थळावरुन यूजर नेम व पासवर्ड तयार करुन घ्यावा. यूजर नेम हा स्वत:चा मोबाईल नंबर असल्यामुळे यूजर अकाऊंट तयार करताना मोबाईल नंबर अचूकपणे भरावा. हा मोबाईल नंबर व पासवर्ड जतन करुन ठेवावा. कारण परीक्षेकरीता पात्र ठरल्यावर ऑनलाईन हॉल टिकीट, अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे अपात्रतेच्या कारणासहीत पत्र व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची ऑनलाईन प्रमाणपत्रे याच यूजर आयडीवर येणार आहेत. तदनंतर लॉग-इन करुन अर्जातील संपूर्ण माहिती भरावी. यूजर अकाऊंट तयार करताना उमेदवाराने एकदा वापरलेला मोबाईल क्रमांक पुन्हा वापरता येणार नाही.

४. उमेदवाराने स्वत:चे अलीकडील रंगीत छायाचित्र ज्याचे बॅकग्राऊंड पांढरे, त्याचा आकार हा ५० मी.मी.आडवा X ६५ मी.मी. उभा व ज्यामध्ये दोनही कान दिसत आहे असा पासपोर्ट साईजचा फोटो (जास्तीत जास्त ५०० KB व JPG/JPEG फॉरमॅटमध्ये) अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावा. या प्रयोजनार्थ छायाचित्र स्कॅन करताना छायाचित्रातील उमेदवार स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी. मुलाखतीच्या वेळी उमेदवार व अपलोड केलेले छायाचित्र यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची मुलाखत घेतली जाणार नाही.

५. उमेदवाराने स्कॅन केलेली सही (जास्तीत जास्त २० KB व JPG/JPEG फॉरमॅटमध्ये) स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी व अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावी.

६. ज्या प्रमाणपत्रात उमेदवाराची जन्मतारीख, त्याचे जन्मस्थळ व तो भारताचा नागरिक आहे असा उल्लेख असलेले व सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र (Nationality Certificate) किंवा अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा पारपत्र (Passport) किंवा शाळा सोडल्याच्या दाखला ज्यामध्ये राष्ट्रीयत्वाच्या कॉलममध्ये भारतीय (Indian) असे नमूद केलेले आहे यापैकी एक प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे.

७. जे उमेदवार महाराष्ट्र राज्याव्यतीरीक्त अन्य राज्यातील डोमिसाईल प्रमाणपत्र सादर करतील त्यांना भारताचे नागरीक असल्याबाबतचे व त्याने सादर केलेले डोमिसाईल प्रमाणपत्र सत्य असल्याबाबतचे अशा दोनही बांबीचा उल्लेख केलेले रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवरील नोटराईज प्रतिज्ञापत्र अर्जासोबत अपलोड करावे.

८. उमेदवाराने नमूद केलेले त्याचे नांव, जन्मतारीख व कायम स्वरुपातील पत्ता, तसेच अपलोड केलेला फोटो व सही हे उत्तीर्ण उमेदवाराला देण्यात येणा-या प्रथम श्रेणी बाष्पक परीचर क्षमता प्रमाणपत्रावर प्रतिबिंबित (Reflect) होणार असल्यामुळे त्याचे पुर्ण नांव, तसेच जन्मतारीख अचूक नमूद करावी, तसेच स्पष्ट दिसेल असा फोटो व सही अपलोड करावी. (उत्तीर्ण उमेदवाराचे प्रमाणपत्र निर्गमित झाल्यानंतर उमेदवाराच्या नांवामधील व अन्य विसंगतीबाबत कोणतीही दखल घेतली जाणार नाही).

९. उमेदवाराने स्वत:च्या नावासंदर्भातील तपशिल एसएससी (SSC) अथवा तत्सम समान दर्जाच्या अर्हता प्रमाणपत्राप्रमाणे नमूद करावा. तसेच नांवात बदल केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत बदलाच्या अनुषंगाने नावात बदल झाला असल्याबाबत राजपत्राची प्रत अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य राहिल.

१०. अर्जात नमूद केलेले शैक्षणिक व इतर कागदपत्रे स्कॅन करुन स्पष्ट दिसत असल्याची खात्री केल्यानंतरच अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावे, जर शैक्षणिक व इतर कागदपत्रे अस्पष्ट दिसत असल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

कृ.मा.प.......३

११. सेवाप्रमाणपत्र (Service Certificate) हे या कार्यालयाच्या mahaboiler.in या संकेतस्थळावर दिलेल्या **नमुन्याप्रमाणेच** कारखान्याच्या/कंपनीच्या लेटरहेडवर असावे व त्यावर जावक क्रमांक व प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक, तसेच अनुभवाचा कालावधी नमूद केलेला असावा. यातील सर्व तपशील हा आपण ज्या विभागात (Steam Boiler Office Division) कार्यरत आहात तेथील बाष्पक निरीक्षण करणा-या अधिका-याकडून (Deputy Director/Joint Director of Steam Boilers) पडताळणी केलेला असावा व त्यावर त्यांची सही व शिक्का असावा. **याप्रमाणे असलेले परिपूर्ण** असे सेवाप्रमाणपत्र स्कॅन करुन स्पष्ट दिसत असल्याची खात्री केल्यानंतरच अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावे.

१२. अर्जामधील भाग-३ (ब) हा फक्त **साखर कारखान्यातील** बाष्पकावर काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारानीच भरावा.

१३. परीक्षेचे विहीत शुल्क रु. ५००/- gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावरुन भरताना **उमेदवार हा कोणत्याही जिल्हयातून अर्ज करीत असेल तरीही त्याने जिल्हा मुंबईच निवडावा** व शुल्क भरल्यानंतर चलन (PDF किंवा JPG/JPEG फॉरमॅटमध्ये) अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावे.

१४. पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र त्यांच्या User ID वर ऑनलाईन पाठविण्यात येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने लॉग-इन करुन डाऊनलोड करावे व त्याची प्रिंट परीक्षेच्या वेळी सोबत घेऊन यावी. तसेच उमेदवाराने ओळखीच्या पुराव्याकरीता पॅनकार्ड किंवा आधारकार्ड किंवा कंपनीचे ओळखपत्र इत्यादी मुळ कागदपत्रे सोबत घेवून यावी.

१५. अर्जासोबत अपलोड केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे ही परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा उमेदवाराची परीक्षा घेतली जाणार नाही.

१६. अर्जातील कन्फर्म बटनावर क्लिक करण्यापूर्वी अपलोड केलेली प्रमाणपत्रे /कागदपत्रे/फोटो/स्वाक्षरी इत्यादी स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी. अपलोड केलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे/फोटो/स्वाक्षरी इत्यादी स्पष्ट दिसत नसल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल.

१७. अपलोड केलेल्या सर्व प्रमाणपत्राचा व सेवाप्रमाणपत्रांचा तपशिल अनुक्रमे अर्जामधील भाग-२ व भाग-३ मध्ये पुर्णपणे भरलेला असावा अन्यथा आपला अर्ज नाकारण्यात येईल.

१८. उमेदवाराने एकच अर्ज सादर करावा. सुधारीत/दुसरा अर्ज सादर करावयाचा असल्यास रुपये ५००/- चे नवीन परीक्षा शुल्क भरुन चलन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक राहील.

उपसंचालक, बाष्पके आणि सचिव,
परीक्षक मंडळ व परीक्षक समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई